आजचा दिनविशेष
१९६५ : पहिले भारत–पाक युद्ध सुरू झाले.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ६ सप्टेंबर २०२५ | अंक २५७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# पुढील २४ तास धोक्याचे, या जिल्ह्यांना हायअलर्ट, आयएमडीचा महाराष्ट्रासाठी मोठा इशारा

देशभरात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला आहे, आता मोठी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे उत्तर भारत, पूर्व भारत, पूर्वोत्तर भारत, दक्षिण भारत, पश्चिम भारत आणि मध्य भारतामध्ये या आठवड्यात भारतीय हवामान विभागाकडून (IMD) जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील तीन दिवस सहा, सात आणि आठ सप्टेंबर रोजी गुजरात राज्यात अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. पुढील दोन दिवस सौराष्ट्र आणि कच्छ




जिल्ह्यांना पाऊस झोडपून काढणार आहे. दुसरीकडे आठ सप्टेंबरपर्यंत उत्तराखंड आणि राजस्थानमधील अनेक जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमधील अनेक भागांना देखील हाय अलर्ट देण्यात आला आहे. सहा आणि सात सप्टेंबर रोजी पूर्व आणि पश्चिम मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि ओडिशा या राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, त्यानंतर आठ आणि 9 सप्टेंबर रोजी पश्चिम बंगाल, सिक्किम आणि बिहार या राज्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील दोन दिवस आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपूरासह अरुणाचल प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये देखील अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. अतिमुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**महाराष्ट्रात पावसाचा अंदाज** दरम्यान सध्या राज्यात ढगाळ वातावरण असून, अनेक भागांमध्ये मध्यम ते मुसळधार स्वरुपात पावसानं हजेरी लावली आहे. पुढील पाच दिवस राज्यातील काही भागांमध्ये पावसाची शक्यता आहे. पुढील 24 तासांमध्ये पालघर, धुळे नंदूरबार आणि नाशिक या जिल्ह्यांसह घाटमाथ्यावर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा आयएमडीकडून देण्यात आला आहे. दुसरीकडे रायगड, मुंबई, ठाणे आणि जळगाव या जिल्ह्यांमध्ये मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात पाऊस उघडीप देण्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. पाच दिवसानंतर राज्यात पावसाचं प्रमाण कमी होण्याचा अंदाज

## ऊमापुर येथे हजरत सय्यद शहानुर बगदादी रहै . दर्गाह संदल व ईदमिलादुन्नबी (पैगंबर जयंती) कार्यक्रम सय्यद महेबुब कादरी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न

चकलंबा प्रतिनिधी : गेवराई तालुक्यातील उमापूर येथे दर्गाह हजरत शहानुर बगदादी रहै. यांचा संदल व उर्स निमित्त उमापूर मध्ये दिनांक ४ सप्टेंबर २०२५रोजी विविध कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले आहे. ऊर्स संदल निमित्त व ईदमिलादुन्नबी दिनांक ४सप्टेंबर २०२५ गुरुवार रोजी सायंकाळी ५:०० वाजता धोंडूभाई हॉटेल (उमापूर फाटा) येथून निघून दर्ग्यावर पोहोचून ७:०० वाजता संदलची फातिहा व कदमे रसूल जियारत करण्यात आली. नंतर लंगरे गौसे आजम संपन्नतसे ईदमि लादुन्नबीचे इतर कार्यक्रम झाले.



चकलांबा पोलीस स्टेशनचे एपीआय संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त देत पीएसआय अनंत तांगडे व पोलीस कर्मचारी यांच्या उपस्थित पार पडले . पूर्ण कार्यक्रम शांततेत पार पडले यावेळी हजरत महेबुब कादरी, पोलीस उप निरीक्षक अनंत तांगडे उमापूरचे दिनकर पाटील माजी जिल्हा परिषद सदस्य संग्राम आहेर, सरपंच किरण आहेर,गेवराईचे समाजसेवक अन्सारी साहेब, सय्यद शाहनुर बगदादी दर्गा सेवक धोंडू भाई, खरेदी विक्री संघाचे सभापती जयदीप भैय्या औटी, अरबाज तांबोली शकील कुरेशी, गणेश टिळेकर जावेद शेख इरफान भैय्या कादरी पत्रकार सय्यद गफार,असलम कादरी

आदी मोठ्या प्रमाणात उमापूर ग्राम स्थ व चकलंबा येथील भक्त गण उपस्थित होते

## बेलखंडी आरक्षण आनंदोत्सव साजरा..

संघर्षयोद्धा मा. मनोजदादा जरांगे पाटील हे गेली अनेक वर्षापासून मराठा आरक्षणासाठी आपल्या जीवाची पर्वा न करता आरक्षण लढा देत होते.मुंबई येथे उपोषण करत असताना राज्य सरकारनी मागण्या म ान्य करत, हैदराबाद गॅझेटला मंजुरी, मराठा आंदोलकांवरील गुन्हे माफ, सातारा गॅझेट लागू करणार, बलिदान दिलेल्या वारसांना शासकीय नोकरी



आदीसह मागण्या मान्य केल्या..काल बेलखंडी येथे मा. मनोज दादांचे व सरकारचे अभिनंदन आणि मुंबईला गेलेल्या बांधवांचा सत्कार सम ारंभ व ढोल तशाच गजरात मि रवणूक संपन्न झाली...यावेळी गावातील महिला, पुरुषांनी लेझीम खेळत आनंदोत्सव साजरा केला.

## घाटनांदुरात मार्केटचा राजा गणेश मंडळ तर्फे शालेय साहित्य वाटप

घाटनांदुर(ता.अंबाजोगाई): सामाजिक बांधिलकी जपत मार्केटचा राजा गणेश मंडळ, घाटनांदुर यांच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष प्रशांत कदम यांच्या मार्फत गावातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत असताना आर्थिक अडचणीमुळे अनेक विद्यार्थी आवश्यक साहित्यापासून वंचित राहतात. या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी वह्या, पेन, पेन्सिल, दप्तर आदी साहित्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला चालना मिळेल तसेच त्यांच्या मनामध्ये शिक्षणाबाबत उत्साह निर्माण




होईल, असे मत मंडळ अध्यक्ष प्रशांत कदम यांनी व्यक्त केले. “गणेशोत्सव हा फक्त सण नसून सामाजिक ऐक्य, मदतीचा आणि समाजकारणाचा संदेश देणारा उत्सव आहे. त्यामुळे मंडळ विविध सामाजिक उपक्रम राबवणार आहे,” असेही त्यांनी सांगितले. सदर उपक्रमाला घाटनांदुरच्या बाजारपेठेतील व्यापारी व गावकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. त्यामुळे छोटा उपक्रम मोठा बोध ठरला. आणि सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला. उपस्थित मान्यवरांनी मंडळाच्या कार्याचे कौतुक करून भविष्यातही अशा विधायक उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली.

## ओम कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा विद्यार्थ्यांनी अनुभवली शिक्षकांची भूमिका

प्रतिनिधी (पाटोदा)पाटोदा येथील नामांकित ओम कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.5 सप्टेंबर या दिवशी स्वतंत्र भारताचे पहिले उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती यांच्या जन्मदिनी सर्व भारतामध्ये शिक्षक दिन साजरा केला जातो. याच शिक्षक दिनाचे औचित्य साधून पाच सप्टेंबर रोजी पाटोदा येथील ओम कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी हा शिक्षक दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. शिक्षक दिन या कार्यक्रमाची रूपरेषा विद्यार्थ्यांनी क्लासेसचे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे सर यांच्या मदतीने आखली व कार्यक्रम योग्यरीत्या पार पाडला.

विद्यार्थ्यांनी अनुभवली शिक्षकांची भूमिका

क्लासेसमधील वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांनी कनिष्ट वर्गास अध्यापन करत पहिल्यांदा शिक्षकांची भूमिका अनुभवली. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर अवीट गोडी झळकत होती. या अध्यापनात कु.कल्याणी दादासाहेब गायके,कु.प्रणिता नामदेव ससाणे,कु,सिद्धी श्रीकृष्ण तांबे,कु.प्रेरणा भागवत शिंदे,कु.यशश्री बाळकृष्ण पाखरे,कु.श्रविका सोमीनाथ खंडागळे आणि दीपक बाळासाहेब चौरे आदि विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत यशस्वीपणे अध्यापनाचे कार्य पार पाडले.



तद्नंतर क्लासेसच्या सभागृहांमध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींनी गायलेल्या स्वागत गीताने झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि अध्यक्ष आणि इतर शिक्षकांना शाल आणि श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त क्लासेसचे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे आणि कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी शिक्षकाचे महत्त्व, समाजात असलेली शिक्षकाची गरज या विषयी भाषणे दिली. शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे कार्यक्रमांमध्ये भाषण स्पर्धा सुद्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये विविध वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपापले भाषणे सादर केली. भाषण स्पर्धेनंतर विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस आणि प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सन्मान करिता त्यांना पुष्पगुच्छ दिले आणि त्यांचे आभार मानले आणि सर्वात शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन घेण्यात आले आणि कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओम कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे, संचालिका प्रा.पूनम खंडागळे यांच्यासह क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## उत्तुंग इच्छाशक्ती म्हणजे आर्या सानप

बीड (प्रतिनिधी) ज्या मुलीला १०२ ताप आहे, खोकला आहे, बोलायलाही त्रास होत आहे, तरीही ती म्हणते – आई, मला खेळायचंच आहे. आमच्या सरांनी वर्षभर मेहनत घेतली आहे, आमच्या मिस काळजी घेतात, तू काळजी करू नकोस हा फक्त खेळ नव्हता, हा तिचा जिद्दीचा विजय होता! जिल्हास्तरीय फुटबॉल अंडर–१४ स्पर्धेत दोन सामन्यांत विजय मिळवून, थेट सेमीफायनल व फायनल गाठू न विभागीय स्तरावर पोहोचण्याचा हा प्रवास म्हणजे अशक्याला शक्य करण्याचं उदाहरणच ठरलं आहे. ही यशोगाथा केवळ आर्याची नाही, तर शिव शारदा पब्लिक स्कूलच्या संपूर्ण टीमची मेहनत, मार्गदर्शन आणि पाठबळ यांचं फलित आहे. आणि आर्या, तू या संधीचं खरंच सोनं केलं आहेस! तुझ्या या जिद्दीला, चिकाटीला आणि यशाला मनः पूर्वक सलाम!बाळा, आम्हाला तुझा खूप अभिमान आहे. तू अशीच यशस्वी होत राहो, हाच आमचा आशीर्वाद. आमची मुलगी आर्या आमचा अभिमान असे विचार तिची आई दक्षा सानप यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. आजचे विद्यार्थी हे उद्याचे भारतीय सामर्थ्य आहेत हे लक्षात घेऊन शाळा समाज पालकांनी त्यांची योग्य जडणघडण करणे अत्यंत गरजेचे आहे.

## पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत यांच्या हस्ते श्रींची आरती ; विसर्जन मिरवणूक उत्साहात संपन्न

कडा (प्रतिनिधी) कडा येथील मानाचा युवराज गणेश मित्र मंडळाच्या श्रींची आरती मंडळाचे सदस्य तथा पनवेल पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत यांच्या हस्ते करण्यात आली. आरती नंतर मंडळाची विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली.मिरवणुकीत भुम येथील प्रसिध्द न्यु झंन्कार ब्रॉंझ बँण्ड यांनी उत्कृष्ट कला सादर केली.पर्यावरणाची व शरीराची काळजी घेत गुलाल ऐवजी रंगीबेरंगी फुलांची उधळण करीत मिरवणूक चा आनंद युवराज मंडळाने घेतला. मंडळाच्या या कृतीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मंडळा तर्फे पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत,न्यु झंन्कार ब्रॉंस बॅण्ड चे संचालक पवन थोरात, महाप्रसादाचे स्वयंपाक बनवणारे आचारी ओंकार अजिनाथ जठाडे,बंदोबस्तासाठी आलेल्या पोलीस बांधवांचे सत्कार करण्यात



आले.तसेच मिरणवणुकी पुर्वी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.मंडळाचे हे ५५ वे वर्षं असून या मंडळात हिंदू -मुस्लीम युवक एकत्रित येऊन दरवर्षी गणेशोत्सव साजरा करतात. कायद्याचे पालन करत शांततेत मिरवणूक पार पडली. हे मंडळ गत ५५ वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव परंपरा जोपासत आले आहे. आष्टी तालुक्यातील जुन्या मंडळापैकी हा एक मंडळ असून कडा येथील मानाचा मंडळ म्हणून ओळख आहे. मिरवणुकीत जोरदार आतषबाजी करण्यात आली. मिरवणूकीच्या शेवटी ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब देशमुख यांच्या हस्ते आरती करण्यात आली.यावेळी मंडळाचे जेष्ठ सदस्य राऊत सर,अध्यक्ष सुरेश उर्फ बाबु तारू, उपाध्यक्ष महेश दळवी, सचिव सागर बोराटे,मंडळाचे पाच वेळेस अध्यक्षपदी राहणारे पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद,घन;शाम ढोबळे पाटील, कौस्तुभ किरण राऊत,आल्ताब शेख,अविनाश ढोबळे,विघ्नेश तारू, शुभम तारू,आरबाज तांबोळी, शिवम इंगवले,आरिफ शेख,ओंकार जठाडे,सलमान सय्यद, विशाल बोराटे,निलेश ढोबळे, आदित्य मोरे, गणेश जठाडे,आवेज पठाण,दर्शन दळवी,मुसेब पानसरे,महेश होळकर,प्रसाद नांगरे,आयान शेख,केतन खंदारे,विक्रम तारु,शिवम तारु, मोईन शेख,अलतमश सय्यद, तन्वीर खान,आकिब खान,सागर खामट,शोएब पानसरे,मुस्तफा सय्यद,रूषी थेटे,आनंद पाचारणे,सह आदी सदस्य उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ६ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## पावसाळ्यात डेंग्यूपासून बचावासाठी काय करावं?




पावसाळा सुरू होताच अनेक आजारांना सोबत घेऊन येतो. पावसाळ्यात अनेकांना संसर्गाच्या समस्या होतात. पावसाळ्यात तुमची रोगप्रतीकारकशक्ती वाढवणे गरजेचे असते. पावसाळ्यात डेंग्यूचे डास सर्वाधिक प्रजनन करतात. अशा परिस्थितीत या ऋतूत डेंग्यू तापाचा धोका खूप वाढतो. जेव्हा डेंग्यूचा डास चावतो तेव्हा तुम्हाला जास्त ताप, डोकेदुखी, डोळे दुखणे आणि अगदी हाड दुखणे यासारख्या समस्या उद्भवतात. या काळात रोगप्रतिकारक शक्ती देखील खूप कमकुवत होते, ज्यामुळे प्लेटलेट्स वेगाने कमी होऊ लागतात. डेंग्यू हा सामान्य ताप नाही, परंतु यामध्ये शरीर पूर्णपणे तुटू लागते. ज्यामध्ये औषधांसोबतच अन्नाची काळजी घेणे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे. डेंग्यूपासून बरे होण्यासाठी चांगला आहार घेणे खूप महत्वाचे आहे. जर तुम्ही योग्य आहार घेतला तर शरीरातील कमजोरी दूर होण्यास, प्लेटलेट्स वाढविण्यास, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास तसेच रक्त वाढवण्यास खूप मदत होते. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला किंवा तुमच्या कुटुंबातील कोणाला डेंग्यू झाला असेल तर ही माहिती फक्त तुमच्यासाठी आहे. येथे आम्ही तुम्हाला सांगू की डेंग्यू झाल्यावर काय खावे आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात? तज्ज्ञांच्या मते, डेंग्यूच्या ४० ते ५० टक्के आजारांवर घरी उपचार करता येतात. फक्त योग्य आहाराची गरज आहे. डेंग्यूमध्ये द्रवपदार्थांचे सेवन जास्त करावे, कारण या काळात शरीरात पाण्याची कमतरता असते, जी द्रवपदार्थ घेऊन पूर्ण करता येते. तसेच, वेळोवेळी प्लेटलेट्स तपासले पाहिजेत. जर प्लेटलेट्सची संख्या १५ हजारांपेक्षा कमी असेल तर रुग्णालयात दाखल होण्याची परिस्थिती उद्भवू शकते. डेंग्यू तापात औषधांव्यतिरिक्त द्रव पदार्थांचे जास्तीत जास्त सेवन करावे. यासाठी नारळपाणी सर्वोत्तम आहे. त्यात व्हिटॅमिन सी, बी-कॉम्प्लेक्स जीवनसत्त्वे, अँटीऑक्सिडंट्स आणि अमीनो ॲसिड आढळतात, जे शरीराला हायड्रेट करण्याचे अनेक फायदे देतात. याशिवाय, तुम्ही गाजराचा रस, पपईचा रस आणि डाळिंबाचा रस घेऊ शकता. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जेव्हा आपल्याला डेंग्यू होतो तेव्हा आपण तेलकट मसालेदार पदार्थ आणि रस्त्यावरील पदार्थ खाणे टाळले पाहिजे. चहा आणि कॉफीपासूनही दूर राहिले पाहिजे. डेंग्यूच्या काळात जास्त गोड पदार्थ खाऊ नका कारण त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. जर तुम्ही मद्यपान आणि धूम्रपान करत असाल तर यापासूनही दूर राहा. डेंग्यू झाल्यास, अन्नासोबतच जीवनशैलीशी संबंधित अनेक गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. हेल्थलाइनच्या मते , डेंग्यू झाल्यास, खूप गर्दीच्या आणि प्रदूषित ठिकाणी जाणे टाळावे. नेहमी पूर्ण बाह्यांचे कपडे आणि मोजे घाला. घराच्या खिडक्या बंद ठेवा.

# सरस्वती माध्यमिक विद्यालय,आकुर्डी शाळेत मोठ्या उत्साहात विद्यार्थी 'शिक्षकदिन' साजरा

निगडी:५ सप्टेंबर,डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस सर्वत्र मोठ्या उत्साहात "शिक्षकदिन" म्हणून साजरा केला जातो.त्या दिवशी विद्यार्थी शिक्षक बनून सर्व इयत्तेतील विद्यार्थ्यांना अध्यापन करतात. खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना अध्यापन व अध्ययन यातील फरक समजतो. शिक्षकांचे कष्ट,मेहनत,त्यांना कोणकोणत्या गोष्टींचा सामना करावा लागतो हे समजते.त्याच अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी सरस्वती माध्यमिक विद्यालय,आकुर्डी पुणे ३५ शाळेत शिशुवर्ग ते ७ वी सकाळ विभागात मोठ्या उत्साहात विद्यार्थी शिक्षकदिन साजरा झाला. इयत्ता ७ वी अ मधील विद्यार्थ्यांनी प्राचार्या,उपप्राचार्य,मुख्याध्यापक ,शिक्षक व शिपाई पद कारभार यशस्वीपणे सांभाळला.प्रत्येकाने त्यांची जबाबदारी मोठ्या आनंदात पार पाडली.एक दिवसाचे म्हणून शिक्षक झालेला त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद टिपण्यासारखा होता.यासाठी माननीय संस्थापक श्री.गोविंदराव दाभाडे सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.मुलांच्या वर्गशिक्षिका सौ.प्रतिमा काळे मॅडम यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले होते. विशेष सहकार्य श्री.अमोल गुंड,श्री. माळे सरांचे लाभले.तसेच शिशुवर्ग ते ७ वी पर्यंतच्या सर्व सहकारी शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्व विद्यार्थ्यांनी आपली सुंदर मनोगते व्यक्त केलीत.सौ.वैद्य,सौ.हराळे,सौ. नवले,सौ.पाटील नयना,सौ.प्रतिमा काळे,श्री.चव्हाण,श्री.अमोल गुंड,शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्यात अन् त्यांच्या कार्याचे कौतुक ही केले.मुख्याध्यापिका:-१)दिव्या सूर्यकांत सोळंके,उपप्राचार्य:२) संस्कार बद्रिनाथ मेनकर,प्राथमिक मुख्याध्यापक:३)श्लोक बाळासाहेब गुंजाळ,४)अमोल गुंड सर:वर्षा अनिल राठोड,५वी ते ७ वी चे विद्यार्थी वर्गशिक्षक:सौ.पाटील मॅडम(६वी,ब):५)दिपल दिनेश पाटील,सौ.उभे मॅडम(६वी,अ): ६)मीरा मंगेश मगर,श्री.आखाडे सर(५ वी ड):७)वैभव योगेश नेटके,सौ.काळे मॅडम(७ वीअ):८) दिव्या सूर्यकांत सोळंके,श्री. कोशीरे सर( जादा शिक्षक):९) राजरत्न भानुदास कांबळे,सौ.



जाधव मॅडम(५वी,क):१०)धनश्री विष्णु पाचारे,शिशूवर्ग:सौ.स्वाती जाधव:११) दिव्या गणेश भोसले,१२) खुशी निलेश जगताप,बालवर्ग:सौ. शांता हराळे :१३)प्रणाली रामहरी गोलेकर,१४)वैष्णवी विवेक नवगिरे,पहिली क: सौ.लता नवले: १५)प्रांजली लहू सावंत,जादा शिक्षक: १६)रिद्धीशा रुपेश मुन,१७)वंशिका सुनिल पाटील,दुसरी अ -कु. वैशाली ढाकणे:१८)कुमोद कैलास माने,दुसरी क -सौ.सुहासिनी वैद्य:१९)मधुकुमारी सुनिलकुमार निर्मलकर,जादा शिक्षक:२०) संस्कृती शिवाजी भुरूक,तिसरी अ -कु.प्रियांका वालकोळी:२१) जान्हवी बापूराव बाजगिरे,तिसरी ब -सौ.सीमा खेडेकर :२२)समृद्धी रवि देवकर,जादा शिक्षक:२३)अंश प्रशांत शर्मा,चौथी अ -सौ.नयना पाटील:२४)साई राजू माळे,चौथी ड:श्री.अविनाश आखाडे:२५)विघ्नेश शंकर सोळसे,जादा शिक्षक:२६) श्रेयस लक्ष्मण तांबे,शिपाई:२७) कृष्णा देविदास कसबे,२८)कृष्णा जगन्नाथ सहानी.

# मिना म्हसे यांना जिल्हा पुरस्कार जाहीर

ता. 05 पुणे प्रतिनिधी जगतापवाडी शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका व औषधी वनस्पती पुस्तकाच्या संपादिका मीना अशोक म्हसे - आसने यांना यावर्षीचा जिल्हा पुरस्कार जाहीर झाला आहे. शिक्षक दिनानिमित्त जिल्हा परिषदेने नुकतीच या पुरस्कारांची घोषणा केली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जगतापवाडी येथे उपशिक्षिका म्हणून कार्यरत असणाऱ्या मीना अशोक म्हसे या विद्यार्थ्यांच्या संदर्भात विविध प्रकारचे उपक्रम शाळेत राबवत असतात. यात काव्य गायन, विद्यार्थी दिंडी, दहीहंडी उत्सव, गणेशमूर्ती बनवणे, परिसरातील उल्लेखनीय व्यक्तीची मुलाखत, औषधी वनस्पतींची लागवड, परिसरातील सापांची माहिती यांसारखी उपक्रम ते शाळेत सतत राबवत असतात. याशिवाय मंथन, शिष्यवृत्ती अशा स्पर्धा परीक्षांचीही तयारीही त्या शाळेत घेतात. मागील जिल्हा परिषद वढू खुर्द शाळेत त्यांनी साठ वर्षातून पहिल्यांदाच शिष्यवृत्तीची परंपरा सुरू केली; ती आजतागायत चालू आहे. तसेच विद्यार्थ्यांना औषधी वनस्पतीची माहिती होण्यासाठी शाळेत औषधी वनस्पतींची लागवड करून त्याची माहिती विद्यार्थ्यांकडून संकलित करून घेतली. त्या संपूर्ण माहितीचे त्यांनी पुस्तक संपादित केले. या त्यांच्या उपक्रमाला शिक्षण विवेक कडून शिक्षण माझा वसा हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे. तसेच या पुस्तकावर विविध नामवंत साहित्यिकांनी परीक्षण देखील लिहिले आहे. विविध



मिना म्हसे यांचा सन्मान करताना राज्य पुरस्कार प्राप्त साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर.

वृत्तपत्रे, मासिके आणि दिवाळी अंकात त्यांचे नियमित लेखन असते. त्यांचा निरागस मने हा कथासंग्रह प्रकाशकाच्या मार्गावर आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पुणे जिल्हा परिषदेने त्यांना यावर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केला आहे.

त्यांना पुरस्कार जाहीर होताच वाबळेवाडी शाळेचे राज्य पुरस्कार प्राप्त साहित्यिक शिक्षक सचिन शिवाजीराव बेंडभर यांनी त्यांच्या राहत्या घरी जाऊन त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

# पैगंबर मोहम्मद (स.अ.व.) यांच्या विलादतीनिमित्त बीड मध्ये भव्य सेवा उपक्रम

## शहबाझेलामकानी कादरी फाऊंडेशनतर्फे अनाथ, निराधार व गरजूंना पाणी, कपडे, चादरी, जलेबी व गुलाबफुले वाटप

बीड प्रतिनिधी :पैगंबर हजरत मोहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या विलादतीच्या मुबारक दिनानिमित्त बीड शहरात आज शहबाझेलामकानी कादरी फाऊंडेशनच्या वतीने एक अद्वितीय सेवा उपक्रम राबविण्यात आला. धर्म, जाती-धर्माच्या भेदाभेदापलीकडे जाऊन "इन्सानियत सर्वात मोठा धर्म" हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. जिल्हा शहरी बेघर न्युरा केंद्र, बीड येथे झालेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने अनाथ व निराधारांना पाणी, नवीन कपडे, उबदार चादरी, गोड जलेबी तसेच प्रेमाचे प्रतीक असलेली गुलाबफुले वाटप करण्यात आली. कार्यक्रमाला आलेल्या लोकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दिसत होते. या वेळी न्युरा केंद्राचे श्री. अभिजीत, श्री. राजू बंजारे व श्री. यशवंत जाधव यांनी विशेष मेहनत घेत कार्य यशस्वी करून दाखवले. कार्यक्रमात कादरी फाऊंडेशनचे ऑल महाराष्ट्र स्टेट अध्यक्ष शेख शहबाझ कादरी यांनी सांगितले की, "पैगंबरांच्या शिकवणीतूनच आम्ही प्रेरणा घेतली आहे. गरीब, अनाथ, निराधार व बेघर लोकांची सेवा करणे हेच खरे इबादत आहे." यावेळी लोकसेवा जिल्हाध्यक्ष अदनान शेख यांनी सांगितले : "हजरत मोहम्मद ? यांचे जीवन हे संपूर्ण मानवजातीसाठी एक मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. त्यांनी नेहमीच इन्सानियतला सर्वात वरचं स्थान दिलं. त्यांनी श्रीमंत-गरीब, राजा-रंक, हिंदू-मुस्लिम, कोणताही भेदभाव केला नाही. त्यांच्या शिकवणीत फक्त एकच संदेश आहे – 'माणसाची सेवा हीच खरी इबादत आहे.' "पैगंबर मोहम्मद ? यांनी अनाथांना आधार दिला, भुकेल्यांना अन्न दिलं, बेघरांना आसरा



दिला, स्त्रियांचा सन्मान राखला आणि समाजातील सर्वात दुर्बल घटकांसाठी लढा दिला. ते म्हणायचे – 'सर्वोत्तम मनुष्य तो आहे, जो दुसऱ्या माणसासाठी सर्वाधिक उपयोगी ठरतो.' "आजच्या काळात आपल्याला त्यांचा हाच संदेश आचरणात आणायचा आहे. जात-पात, धर्म, संपत्ती यापलीकडे जाऊन एकमेकांना आधार देणे, अडचणीत उभे राहणे आणि प्रेम व बंधुत्वाने जगणे हेच त्यांचे खरे वारस होणे आहे."

तसेच उबैद हाश्मी, अबुझेर पटेल, इरफान शेख, जहिरभाई, जहिर तांबोळी, जैन तांबोळी, निहाल तांबोळी, मोमिन इरफान, सोहेल खान पठाण यांची विशेष उपस्थिती लाभली. या उपक्रमाचे बीड शहरात मोठ्या प्रमाणावर स्वागत झाले असून, सामाजिक संस्थांकडून कादरी फाऊंडेशनच्या कार्याचे कौतुक करण्यात येत आहे. अनेक नागरिकांनी या कार्याला "मानवतेचा खरा उत्सव" असे संबोधले.

# जनावरे चोरणारी टोळी पकडली; तीन गुन्हे उघडकीस

## पाच जनावरे व दोन चारचाकी वाहने हस्तगत; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

बीड । प्रतिनिधी पोलीस अधीक्षकांनी बीड जिल्हयामध्ये जनावरे चोरणाऱ्या ईसमांची माहीती काढुन कारवाई करण्याचे आदेशित केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले होते. दिनांक ३ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदारामार्फत माहीती मिळाली की, नितीन संजय जाधव रा गांधीनगर बीड याने चारचाकी वाहनांमध्ये जनावरे चोरुन आनल्या असुन त्याचे घरी बांधल्या आहेत. सध्या नितीन घरात आहे अशी माहीती मिळाल्यावरुन ताबडतोब पथकाने सदरील ठिकाणी जावुन त्यास ताब्यात घेवुन चोरी केलेल्या तीन जनावरे हस्तगत केल्या. या बाबत विचारपुस केली असता त्याने कुंभारवाडी परीसरातुन जनावरे चोरल्याचे कबुल केले आहे. त्याचे कडुन शेळया चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.त्यास पुढील तपासकामी पोलीस ठाणे शिरुर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. आरौपीने पोलीस ठाणे शिरुर गु.र.नं २५५/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस, गु.र.नं २५६/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस , गु.र.नं २५७/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस असे गुन्हे दाखल आहेत. तसेच दिपक चंदु गुंजाळ रा. गांधीनगर यास देखील गांधीनगर येथुन ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन दोन जनावरे व चोरी करण्यासाठी वापरात आनलेले वाहन असे जप्त



करुन त्याचे कडुन खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आनले आहेत. पोलीस ठाणे गेवराई गु.र.नं ५१४/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस वरील दोन्ही प्रकरणात एकुण चार आरोपी निष्पन्न झाले असुन पैकी दोन आरोपी अटक करण्यात आले आहेत. दोन फरार आरोपींचा शोध पोलीस ठाणे शिरुर व गेवराई हे घेत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने एकुण चार जनावरे चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन चारही गुन्हयातील चोरीस गेलेली जनावरे व चोरी करण्यासाठी वापरात आणलेली वाहने असा एकुण ८,७९,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे गेवराई यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक नवनित कॉंवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, आशपाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे, महीला पोलीस हवालदार स्वाती मुंडे चालक सिध्देश्वर मांजरे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी मिळुन केली आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ६ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# गीतकार भारत कवितके यांचे ‘माझी राणी.’ विरह गीत युट्यूबवर प्रसारित झाले

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. हृदय भेदक विरह गीत, निसर्गाशी जवळीक साधणारे शब्द, कवीच्या भावना तीव्र असतात, त्या शब्दा शब्दात ठासून भरलेल्या आहेत. पी.पी.म्यझिक समुहाचे श्रीराम घडे यांचे गाण्याबद्दल उत्तम नियोजन,सुरीली चाल,मधुर श्रवणीय सतत ऐकत राहवा असा आवाज गायक विकास साळवे आणि प्रसिद्ध संगीतकार चंदन कांबळे यांचे संगीत अप्रतिम, आणि वयाच्या ६७ वर्षी तरुण तरुणींना, वृध्दांना भुरळ पाडणारे गीतकार भारत कवितके यांचे गीत,ठेका धरायला लावणारे गाणे, कवी आपल्या या विरह गीतात आपल्या प्रियेसीच्या ( राणीच्या) विरहाने व्याकूळ होऊन तिची भेट होत नसल्याने चंद्र सूर्याला विचारतो अरे चंद्र सूर्य हो तुम्ही माझ्या राणीला कुठे पाहिले आहे का? पाना , फुलांनों कुठे, कशी असेल




माझी राणी तुम्ही तरी मला सांगा, जीवनाच्या अंधारल्या वाटेत चाचपडत राहिलों, राणीच्या आठवणी मनात जपत राहिलो,तिची भेट होत नसल्याने कवीला ती भेटण्याची आशा निरर्थक वाटू लागते,सतत तिच्या भेटीची ओढ मनाला लागली आहे, गावातल्या आमच्या भेटीच्या काही खूणा दिसतात का कवी ने गावात फिरून पाहिले, ज्या बागेत आम्ही दोघे भेटायचो त्या बागेत कवी फिरुन आला, कदाचित ती तिथे कवीची वाट पाहत बसली असावी असे कवीला वाटते,तिची भेट झाली नाही म्हणून निराश झालेला कवी म्हणतो माझ्या मनाला आज कळले “ तुटणे” काय असते, आणि राणी शिवाय जीवन जगणे काय असते?, खूप कठीण असते, कवी वादळ वार्याला विचारतो तुम्हाला माझी राणी दिसली का? पूर्वी आम्ही दोघांनी मिळून सर्व ॠतू अनुभवले आहेत, पाहिले आहेत, आता मी दिशा दिशाला तीला शोधले, कवीला सारे जग लहान वाटते, त्यात तिचा शोध घेतला पण नाही सापडली,परत ढगाला, पावसाला कवी विचारतो पावसा तुझ्या मुळे माझी राणी भिजली होती का? तुला ती दिसली का? राणीचा स्वभाव कणखर आणि जिद्दी जरी असला तरी ती कवी साठी फारच हळवी व्हायची, कवी व राणी यांची शेवटची भेट झाली तेव्हा सांजेची वेळ होती, आणि त्या वेळी निरोप घेताना उद्या भेटू अशी शपथ घेतली,पण....पण... ती पुन्हा आलीच नाही.... म्हणून कवी रात्र व दिवसाला विचारतो की,माझी राणी परत येईल का? कवीचे विरह शब्द रसिकांच्या जिव्हारी लागतात, आणि मनापासून हलकेच बोलून जातात... नक्कीच भेटेल तुम्हाला तुमची प्रिय राणी...... आम्हाला ती दिसली की तुम्हाला नक्कीच कळवू तुम्हाला.... तुमच्या मोबाईलवर.....

# आई वडिलांसह डॉ. शिवचरण उज्जैनकर यांचा सत्कार

शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा नवीन माध्यमिक विद्यालय, पारंबी येथील ज्येष्ठ शिक्षक डॉ. शिवचरण उज्जैनकर यांचा नुकताच जिल्हा बँक निमखेडी बुद्रुक शाखेचे व्यवस्थापक तथा समाजसेवक श्री जी.एन. शेजोळे साहेब यांनी ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त डॉ. शिवचरण उज्जैनकर यांचे वडील श्री मधुकरराव उज्जैनकर आणि आई सौ. अनुसयाबाई उज्जैनकर यांचा पुष्पहार अर्पण करून सत्कार केला त्यानंतर श्री शेजोळे साहेब आणि श्री शरद बोदडे सर यांनी डॉ.उज्जैनकर यांचा गुलाब बुके देऊन सत्कार केला. डॉ. शिवचरण



उज्जैनकर हे गेल्या २७ वर्षापासून नवीन माध्यमिक विद्यालय, पारंबी तालुका मुक्ताईनगर येथे अध्यापनाचे पवित्र काम करत आहेत सोबतच त्यांच्या शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन तर्फे विविध शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, कला व आरोग्य क्षेत्रातील विविध राज्यस्तरीय व अखिल भारतीय उपक्रम ते सतत राबवत असतात. त्यांना पद्मश्री डॉ. मनीभाई देसाई मानव सेवा ट्रस्ट, पुणे आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकार व नीती आयोग सलग्न दिल्ली आयएसओ मानांकन प्राप्त डॉ. रवींद्र भोळे आरोग्य सेवा केंद्र, पुणे यांच्या वतीने जाहीर झालेला आहे डॉ. उज्जैनकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक कार्यासाठी हा मानाचा पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला हा पुरस्कार त्यांना सपत्नीक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पुणे येथे एका भव्य समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.याप्रसंगी समाजसेवक श्री जी.एन. शेजोळ साहेब, श्री शरद बोदडे सर व श्री धनराज सापधरे यांनी डॉ. उज्जैनकर यांच्या कार्याचे कौतुक केले.

# अन्न व औषध प्रशासन विभाग झोपेत? कारवाई शून्य, विभाग कुठे आहे?

बीड (प्रतिनिधी) - शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंध असलेल्या अन्नपदार्थांमध्ये हलगर्जीपणा सुरू असल्याचे सातत्याने समोर येत आहे. प्रसिद्ध मिठाई दुकाने, हॉटेल्स तसेच खाद्यपदार्थ विकणाऱ्या ठिकाणी ग्राहकांच्या आरोग्याची कोणतीही काळजी घेतली जात नाही. नुकतेच पेढ्यामध्ये केसाचे तुकडे आढळून आले, ही घटना उघडकीस आल्यानंतर नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे.या गंभीर प्रकरणाकडे अन्न व औषध प्रशासन विभागाने (F$DA) अजूनही डोळेझाक केली असल्याची भावना जनतेत आहे. विभाग झोपेतून कधी जागा होणार? दोषींवर खरोखर कारवाई होईल का? या प्रश्नांची चर्चा सर्वत्र





सुरू आहे.ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कडक कारवाई व्हावी, दोषींना शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. केवळ नोटीस काढणे किंवा किरकोळ दंड ठोठावणे एवढ्यावरच प्रशासनाची जबाबदारी संपत नाही; तर ग्राहकांना स्वच्छ आणि सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. नागरिकांचा सवाल :अशा घटनांमुळे ग्राहकांचा विश्वास कुठे जाणार?दूषित अन्न खाऊन नागरिकांच्या आरोग्याची हानी झाली तर त्याची जबाबदारी कोण घेणार?दोषींवर प्रत्यक्षात कडक कारवाई करून आदर्श घालून दिला जाणार का?अन्न व औषध प्रशासन विभागाने झोपेतून जागे होऊन त्वरीत तपास करून योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे. अन्यथा निष्काळजी व बेजबाबदार व्यापाऱ्यांच्या मनमानीला आळा बसणार नाही आणि ग्राहकांच्या जीवाशी खेळ सुरूच राहणार आहे.

## शिक्षक दिनानिमित्त




शिक्षक म्हणजे फक्त शाळा कॉलेजमधला गुरु नव्हे, तर जीवन घडवणारा प्रत्येकजण, प्रत्येक अनुभव हा खरा शिक्षक आहे. आपण शिक्षक म्हटलं की लगेच समोर येतो तो वर्गात उभा राहून पुस्तकं वाचून सांगणारा व्यक्ती. पण खरं पाहता शिक्षक होण्यासाठी पदवी, प्रमाणपत्र किंवा वयाची मर्यादा कधीच लागत नाही.

एखादं मूलही मोठ्याला शिकवू शकतं की निरागसतेतून जगाकडे कसं पाहायचं. एखादा शेतकरी शहरातील वकिलालाही शिकवू शकतो की मातीशी नातं तोडलं तर जीवनाचं पान कोरडं होतं. एखादा अनपढ माणूसही आपल्या साध्या, प्रामाणिक जगण्यातून शिकवू शकतो की खरं ज्ञान हे अक्षरात नसून आचरणात असतं.

शिक्षक कसा असावा? तर त्याने स्वतः उदाहरण घालून द्यावं. विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्न निर्माण करावा, पण उत्तर द्यायला भाग पाडू नये. त्याने केवळ शिकवणं नाही तर विचार करण्याची दृष्टी द्यावी. विद्यार्थ्याला अपयश आलं तरी त्याला उभं करण्याची ताकद शिक्षकाकडे असावी. कठोरतेतही ममत्व, आणि ममत्वातही शिस्त ही खरी शिक्षकाची खूण आहे.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे शिक्षणाला कधीच अट नसते. “मी शिकलेलो नाही म्हणून शिकवू शकत नाही” हा गैरसमज आहे. कारण आयुष्य हीच सर्वात मोठी शाळा आहे. अनुभवाची प्रत्येक पाने हीच खरी पुस्तकं आहेत. फक्त आपण विद्यार्थी होण्याची तयारी ठेवली, अहंकार बाजूला ठेवला, की मग प्रत्येकात आपल्याला शिक्षक दिसतो.

म्हणूनच शिक्षक दिन म्हणजे केवळ गुरुजनांना अभिवादन नाही, तर आपल्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक अनुभवाला वंदन आहे. कारण गुरु कोणत्याही रूपात भेटला तरी तो आपल्याला घडवतो, विचारांना दिशा देतो, आणि जीवन अर्थपूर्ण करतो.खरं तर, शिक्षक दिन आपल्याला एकच शिकवण देतो “ज्ञानाला कधीच वय, वर्ग, जात, पदवी, भाषा, सीमा नसते; विद्यार्थी होण्याची तयारी असेल तर प्रत्येक क्षण, प्रत्येक व्यक्ती हा आपला शिक्षक असतो.”

©® सचिन कमल गणपतराव मुळे...
परभणी, ९७६७३२३३१५

# सौ. वसुधा वैभव नाईक यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त

लायन्स क्लब ऑफ,पुणे- धनकवडी आणि श्रीराम योगसाधना, धनकवडी यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान केले. ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन यानिमित्ताने ४ सप्टेंबर २०२५ च्या मावळतीला लायन्स क्लब व श्रीराम योगसाधना यांच्या विविध पदाधिकाऱ्यांकडून सौ. वसुधा वैभव नाईक यांच्यासह एकूण २६ मुख्याध्यापक,शिक्षक यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान केला. यावेळी उपस्थित असणारे लायन्सचे विविध पदाधिकारी खालील प्रमाणे-

ला.राजेशजी अग्रवाल,ला. श्रेयसची दिक्षीत, ला. सलील कारखानीस, ला. सुनीलजी भट, ला. भानुदास पायगुडे, ला. फुलचंद चाटे, निलांबरी बहादरपुरे, रवींद्र साधूल, ला. सुनील जगताप, ला. संगीता वेताळ, ला. पंडित पतंगे

इत्यादी मान्यवरांनी आदर्श मुख्याध्यापकांचा, शिक्षकांचा सत्कार केला. ला. राजेशजी अग्रवाल यांनी लायन्स क्लबच्या माध्यमातून सामाजिक सेवा कशी घडते हे सांगितले.

ला. सुनील जगताप यांनी आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या सर्व शिक्षकांचे भरभरून कौतुक केले. रवींद्र सादूल यांनी श्रीराम योग साधना बद्दल माहिती सांगितली. निलांबरे बहाद्दरपुरे यांनी सर्व शिक्षकांचे कौतुक केले व स्वतः शिक्षक होत्या त्यावेळी त्यांचे दिवस कसे होते त्याचे काही क्षण कथन केले.

मा. कीर्ती पंडित यांनी स्वतः चा शिक्षक ते मुख्याध्यापक प्रवास कथन केला. मोजक्या मुख्याध्यापकांचे कार्यक्रमाबाबतचे मनोगत झाले. ला. संगीता वेताळ या स्वतः कवयित्री व लेखिका आहेत त्यांनी उत्तम सूत्रसंचालन केले.





दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ६ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# गणेश विसर्जनासाठी मुंबईत कडेकोट बंदोबस्त, सुरक्षेसाठी CCTV व ड्रोनसह पहिल्यांदाच AI चाही वापर

आज (6 सप्टेंबर) अनंत चतुर्दशी आहे. उद्या मुंबईसह संपूर्ण देशात गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात येणार आहे. या काळात मुंबई पोलिसांकडून सुरक्षेची खास खबरदारी घेण्यात येत आली. मुंबईत हजारो पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तैणात करण्यात आली आहे. मुंबईतील विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आणि एआयच्या माध्यमातून नजर ठेवली जाणार आहे. उद्या शहरातील अनेक रस्ते बंद ठेवण्यात आले आहेत. 1 ते दीड लाख गणेश मूर्तींचं विसर्जन होणारमुंबईतील सुरक्षा व्यवस्थेबाबत मुंबई पोलिसांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली. कायदा आणि सुव्यवस्था विभागाचे सहपोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी यांनी म्हटले की, उद्या अनंत चतुर्दशीनिमित्त होणाऱ्या विसर्जनाच्या अनुषंगाने मुंबई पोलिसांनी तयारी केलेली आहे. हा उत्सव राज्योत्सव म्हणून सरकारने घोषित केलेला आहे. उद्या 6 हजार 500 सार्वजनिक गणेश मूर्तींचं आणि जवळपास एक ते दीड लाख घरगुती मूर्तींचे विसर्जन आहे. त्यासाठी आवश्यक असणारे कृत्रिम तलाव आणि सार्वजनिक मूर्तींच्या विसर्जनासाठी चौपाट्या तयार आहेत. चौपाट्यांवर लाइफ गार्ड,





मुंबई पोलीसंचा बंदोबस्त आहे. हजारो अधिकारी-कर्मचारी तैणात गणेश विसर्जानासाठी 12 अतिरिक्त पोलीस आयुक्त, 40 डीसीपी आणि 61 एसीपी सोबतच 3 हजार अधिकारी आणि 18 हजार कर्मचारी, 14 एसआरपीएफ आणि क्यूआरटी पथके तैणात आहेत. 10 हजार सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोनच्या माध्यमातून नागरिकांवर लक्ष ठेवले जाणार आहे. तसेच एआय कॅमेऱ्यांच्या माध्यमातूनही लक्ष ठेवले जाणार आहे. बिट मार्शल, निर्भया पथक आणि साध्या वेधातले पोलिसही तैनात असणार आहेत. गणेशोत्सव मोठ्या उत्साहात लोकांनी साजरा करावा, मात्र पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन सत्यनारायण चौधरी यांनी केलं आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम काय म्हणाले?गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी याबाबत म्हटले की, आजपर्यंत गणेशोत्सवाला कधीच बाप्पाच्या कृपेनं गालबोट लागलेलं नाही. मुख्यमंत्र्यांनीही याबाबच आढावा बैठक घेतली होती. यंदा सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आपण केला आहे. सेन्सेटिव्ह भागात आपण एआयचा वापर केला आहे. अनेक ठिकाणी पोलिस कर्मचारी तैणात करण्यात आले आहेत. मुंबई पोलिसांना धमकी मिळाली होती, यावर बोलताना कदम म्हणाले की, मुंबई पोलीस अलर्ट असतात, आपली इंटेलिजन्स ॲक्टीव्ह आहे. सोर्स शोधणं सुरु आहे, घाबरुन जाण्याचं कारण नाही.

# बीड शहरातील गजबजलेल्या रस्त्यांवरची वाहतूक कोंडी फोडा

शहरातील अण्णाभाऊ साठे चौक ते सुभाष रोड,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक व भाजीमंडी राजुरी वेस ते कारंजा रोड पर्यंत वाहतूकची होत असलेली कोंडी फोडण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वतीने पोलिस अधीक्षक कार्यालयात करण्यात आली. बीड शहरातीलच नव्हे तर जिल्ह्यातील व्यापारासाठी प्रसिद्ध असलेल्या व नेहमी सणासुदीच्या कळत जिल्ह्यातील नागरिकांच्या खरेदीसाठी पहिली पसंत असलेल्या असा व्यापारी क्षेत्र म्हणजे सुभाष रोड.या व्यापारी क्षेत्रात नेहमी जिल्हाभरातून खरेदीसाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांची गर्दी असते.या सणासुदीच्या काळातील अण्णाभाऊ साठे चौक ते सुभाष रोड डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक व भाजीमंडी राजुरी वेस ते कारंजा रोड पर्यंत रस्त्याची अथवा वाहतुकीची कोंडी होत आहे. यावर उपाय म्हणून अतिरिक्त पोलिस कार्मचार्याची नियुक्ती करून वाहतुकीत होत असलेली कोंडी फोडण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उप विभागीय पोलीस अधिकारी बालकृष्ण हनपुडे यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रामेश्वर आबा साळुंखे (जिल्हाध्यक्ष मनसे शेतकरी सेना),अमर जान पठाण (बीड शहराध्यक्ष), आकाश सुरवसे (जिल्हाध्यक्ष मनसे सहकार सेना), शैलेश जाधव (बीड कार्यालय अध्यक्ष), आकाश टाकळकर (बीड शहर उपाध्यक्ष), कार्तिक ज्वेलरी (बीड शहर सचिव),विजय शिंदे (बीड शहर उपाध्यक्ष) सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होत



गणपती बाप्पा मोरया जातेगाव! प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील मौजे ठाकर आडगाव येथील छत्रपती शिवराजे गणेश मित्र मंडळाच्या स्थापित गणरायाची आरती करण्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते पत्रकार, आकाश सोनवणे,व पत्नी ज्योती सोनवणे यांना योग आला. यावेळी सर्व मित्रपरीवार व गावकरी मंडळी आदी उपस्थित होते.

# सेंट ॲन्स मुलीचा संघ अजिंक्य




बीड : दि.३(प्रतिनिधी) : क्रिडा राज्य व युवक सेवा संचानालय महाराष्ट्र पुणे व क्रिडा अधिकारी कार्यालय बीड याच्या संयुक्त विद्यमाणने आयोजीत जिल्हास्तरिय शालेय

फुटबॉल स्पर्धेत सेंट ॲन्स इंग्लिश स्कूलच्या १७ वर्षे वयोगटातील मुलीच्या संघाने अंतिम ( फाइनल) सामन्यात अंबाजोगाईच्या योगेश्वरी विद्यालय संघाचा पराभव करत स्पर्धा जिंकली.सप्टेंबर मध्ये परभणी येथे होत असलेल्या विभागीय स्पर्धेत संघ सेंट ॲन्सचा संघ बीड जिल्हयाचे प्रतिनिधत्व करणार आहे. या विजेत्या टीम चे शाळेचे प्राचार्य सिस्टर शर्मिला, सिस्टर सुहीला, सिस्टर शाईनी आदिंनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धे करीता शुभेच्छा दिल्या. या खेळाडुंना क्रिडा शिक्षक शेख अफरोज, शेख अनिस, किशोर काळे यांचे मार्गदर्शन केले.

# प्रलंबित वक्फ प्रकरणे तात्काळ निकाली काढा, अन्यथा चेअरमनांच्या घरांवर तीव्र आंदोलन - शब्बीर अन्सारी यांचा इशारा

नांदेड :तहरीक-ए-औकाफच्या वतीने वक्फ बोर्डाकडे ५४ प्रलंबित प्रकरणांचे निवेदन देण्यात आले होते. त्यातील सात प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याचे आश्वासन मिळूनही तब्बल सहा महिने उलटले आहेत. दुर्दैवाने एका प्रकरणाचा अपवाद वगळता उर्वरित सर्व प्रकरणांवर अद्याप धुळफेक होत आहेत.या पार्श्वभूमिवर येत्या ९ सप्टेंबर रोजी मुंबईत होणाऱ्या बैठकीत प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निकाल न लागल्यास वक्फ बोर्डाच्या सदस्यांच्या व चेअरमनांच्या घरांवर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा तहरीक-ए-औकाफचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ ओबीसी नेते शब्बीर अन्सारी साहेब यांनी आज नांदेड येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिला.नांदेड जिल्ह्यातील हजरत दुलेशाह रहेमान दर्गाह आणि बिलोलीतील ऐतिहासिक काला पत्थर मशीद हजरत नवाब सर्फराज खान सहाब मखबरा झुजागणं नगारखाना काब्रस्तान परिसरातील भूखंडांची प्रकरणे विशेष महत्त्वाची असून त्यांचा तातडीने निपटारा करणे अत्यावश्यक आहे, असे अन्सारी साहेब म्हणाले.शब्बीर अन्सारी सध्या कर्करोगासारख्या गंभीर आजारावर उपचार घेत असूनदेखील हजरत दुलेशाह रहमान






यांच्या १४७व्या उर्सनिमित्त नांदेडला हजेरी लावून स्थानिक प्रतिष्ठित नागरिकांशी संवाद साधला व पत्रकार परिषद घेऊन नांदेड येथील प्रलंबित प्रकरणासाठी वक्फ बोर्डाला जबाबदार ठरवले.नांदेडच्या शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत तहरीक-ए-औकाफ नांदेड जिल्हाध्यक्ष फारुक अहमद, मार्गदर्शक एम. ए. हफीज, शफी मुसा, ॲड. शेख बिलाल, महंमद कासिम, ॲड. महंमद शाहेद, इम्रान खान, हैदर अली, आजम खान आदी उपस्थित होते. तसेच ओबीसी संघटनेचे रिजवान कुरैशी, अब्दुल मोहीत यांसह इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# पुण्यात गँगवॉर! नगरसेवकाची हत्या करणाऱ्या आरोपीच्या मुलाला संपवलं, घटनेने शहर हादरलं

पुण्यातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सतत वाढ होताना दिसत आहे. आता पुण्यातून गँगवॉरची घटना समोर आली आहे. नगरसेवक वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपी गणेश कोमकरच्या मुलाची हत्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. शहरातील नाना पेठ परिसरात ही घटना घडली आहे. या घटनेत गणेश कोमकरचा मुलगा गोविंद कोमकरवर 3 गोळ्या झाडण्यात आल्या. यात गोविंदचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. वर्षभरापूर्वी वनराज आंदेकर यांची हत्या झाली होती. या प्रकरणात गणेश कोमकरचा हात असल्याचे समोर आले होते. त्यानंतर आता गणेशचा मुलगा गोविंद यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. त्यामुळे पुण्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा उपस्थित झाला आहे. या घटनेमुळे नाना पेठ परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे समोर आलेल्या माहितीनुसार काही हल्लेखोरांनी नाना पेठेत गोविंद कोमकरवर गोळीबार केला. हल्लेखोरांनी त्यांच्यावर 3 गोळ्या झाडल्या. या गोळीबाराच्या घटनेत गोविंदचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत तपासकार्य सुरु केले आहे. गणपती विसर्जनाच्या पूर्वसंध्येला ही घटना घडली आहे. कारण सध्या शहरात पोलिसांचा मोठा फौजफाटा तैणात करण्यात आला आहे, कडक सुरक्षा व्यवस्था असतानाही ही घटना घडली आहे.

वनराज आंदेकर यांची हत्या

पुण्यातील गजबलेला परिसर म्हणून ओळखला जाणाऱ्या नाना पेठेमधील डोके तालमीच्या समोर वनराज आंदेकर यांची हत्या करण्यात आली होती. वनराज आंदेकरांवर हल्ला करण्याआधी त्या परिसरातील लाईट





घालवण्यात आली होती. त्यानंतर दुचाकीवर आलेल्या तीन ते चार जणांनी ते एकटे असल्याचे पाहून हल्ला केला. वनराज यांच्यावर आधी कोयत्याने वार केले आणि त्यानंतर गोळीबार केला. वनराज आंदेकर रक्ताच्या थारोळ्यात पडले असताना तिथून हल्लेखोरांनी पळ काढला होता यानंतर वनराज यांचा मृत्यू झाला होता. पुणे महापालिकेच्या 2017 च्या निवडणुकीमध्ये वनराज आंदेकर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नगरसेवक म्हणून निवडून आसले होते. वनराज आंदेकर यांच्या आई राजश्री आंदेकर या 2007 आणि 2012 च्या महापालिका निवडणुकीमध्ये नगरसेविका होत्या. त्यासोबतच वनराज आंदेकर यांचे चुलते उदयकांत आंदेकर हेसुद्धा नगरसेवक राहिले होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com